श्रद्धांजली

प्रसिद्ध लेखक, दिग्दर्शक, अभिनेते, निर्माते विजय आनंद यांचं नुकतंच निधन झालं. त्यांच्या कारकीर्दीचा आढावा...

□ रेखा खान





गोल्डी गेले सुवर्णयुग संपलं



पत्नी सुषमा आणि पुत्र वैभवः अखेरचा निरोप देताना



विजय - देव - चेतनः तीन महारथी


नौ दो ग्यारह


हम दोनों


हकीकत

महान गायिका सुरैय्या यांच्या निधनाच्या धक्क्यातून ही इंडस्ट्री अजून पुरती सावरलेली नाही, तोच विजय आनंद यांच्या मृत्यूचा दुसरा धक्का सिनेरसिकांना बसलाय. अगदी काल परवा म्हणजे २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने त्यांच्याबरोबर देशभक्तीशी संबंधित कितीतरी गप्पा झाल्या होत्या. त्यांच्या स्वरात देशप्रेम जाणवत होतं. त्या दिवशी त्यांच्या देशप्रेमावर आधारित *हकीकत*च्या निर्मितीच्या अनेक आठवणी त्यांनी सांगितल्या. त्या दिवशी हा ६९ वर्षाचा तरुण खरोखरच 'अब तुम्हारे हवाले वतन साथियों...' असं म्हणत आपल्या हाती देशाची आणि इंडस्ट्रीची बागडौर सोपून कायमचा निरोप घेईल, याची कोणाला कल्पना होती?

खरोखरच विजय आनंद कर्मयोगी होते. बॉलीवूडमध्ये त्यांना 'गोल्डी' या नावानेच लोक ओळखत होते. त्यांच्या प्रतिभेत प्रयोगशीलता आणि सर्जनात्मक शैलीचा सुरेख संगम होता. त्यांचे मोठे बंधू चेतन आनंद आणि देव आनंद यांच्या छत्रछायेत न राहता त्यांनी आपली स्वतंत्र शैली फुलवली तसं पाहायला गेलं तर, विजय आनंदची फिल्मी कारकीर्द १९५७ मध्ये *नौ दो ग्यारह*पासून सुरू झाली. त्यांचे बंधू देव आनंद यांच्याच तालमीत. शिक्षण घेत असतानाच त्यांना या क्षेत्रात रुची वाटू लागली होती. वेगवेगळे प्रयोग करणारी नाटकं लिहायची, ती सादर करायची, त्यांचं दिग्दर्शनच नाही तर वेळ पडल्यास अभिनयही करायचा, अशी चौफेर कलासाधना कॉलेजच्या दिवसांत चालू होती. १९५४ मध्ये दिल्लीच्या अखिल भारतीय विश्वविद्यालयच्या युथ फेस्टिवलच्या नाट्यस्पर्धेत त्यांनी एक अभिनव नाटक सादर केलं. त्याचा विषय होता, पडद्यामागे नाटकाची तयारी कशी केली जाते. त्यावेळी त्या ठिकाणी परिक्षक म्हणून आलेल्या प्रेमनाथनी त्यांची प्रतिभा नेमकी हेरली. पण दुर्दैवाची गोष्ट अशी की विजय आनंदना त्यांच्या घरातल्या कोणीच फारसं गंभीरपणे घेत नव्हतं. त्याची दोन कारणं होती. एकतर त्यांचं शिक्षण सुरू होतं आणि घरातले दोन मोठे भाऊ चेतन आणि देव दोघंही आतंरराष्ट्रीय स्तरावर आपल्या प्रतिभेचा झेंडा फडकावून मोकळे झालेले होते. पण जेव्हा विजय आनंद यांनी आपल्या स्वतंत्र प्रतिभेच्या जोरावर बनवलेला *टॅक्सी ड्रायव्हर* पडद्यावर आला, त्यांच्या मार्गातले सगळे अडथळे आपोआप दूर झाले.

एका मुलाखतीत विजय आनंद म्हणाले होते, 'त्यावेळी माझ्या डोक्यात असंख्य विचारांचं काहूर माजलेलं असायचं. *नौ दो ग्यारह*ची कल्पनाही एका बाईंडेड स्क्रिप्टच्या रुपात तयार होती. मी माझ्याच लेखनाचं दिग्दर्शन करायला उत्सुक होतो. मी जेव्हा पापां(देवसाहेवांना ते पापा म्हणत)कडे हा प्रस्ताव ठेवला, तेव्हा त्यांनाही ती कल्पना आवडली. पण, 'अजून तुझं शिक्षण पूर्णही झालेलं नाही,' असं म्हणून त्यांनी मला टोकलं. मी दिग्दर्शनाची जबाबदारी पेलू शकतो का असा रोखठोक प्रश्न त्यांनी मला केला. मी त्यांना म्हटलं, 'तुम्ही एकदा स्क्रिप्ट तर ऐका.' आम्ही त्यावेळी दुसऱ्या कुठल्या तरी चित्रपटाच्या शूटिंगसंदर्भात महाबळेश्वरला निघालो होतो. पण पापांनी नॅरेशन ऐकलं मात्र, मला लगेच दिग्दर्शनाची सूत्रं सोपवण्याचा निर्णय त्यांनी घेतला.'

अशारितीने विजय आनंद यांच्या फिल्मी कारकीर्दीचा शुभारंभ झाला तो *नौ दो ग्यारह*च्या दिग्दर्शनापासून. त्यानंतर पडद्यावर आलेला त्यांचा *कालाबाजार*ही तूफान चालला. विजय आनंद यांना लेखक-दिग्दर्शक म्हणून इंडस्ट्रीत आदराने ओळखलं जाऊ लागलं. लोक त्यांना पाथ ब्रेकिंग दिग्दर्शक म्हणू लागले. याचं कारण, त्यांनी हिंदी सिनेमात अनेक नवे नवे प्रयोग केले. असं म्हणतात की, हिंदी चित्रपटांत फ्लॅश बॅक सीन्स आणण्याचं श्रेय विजय आनंद यांना जातं. चित्रपट निर्मितीत ट्रॉलीजचा प्रयोगही त्यांनीच पहिल्यांदा केला होता. *हकीकत*मध्ये त्यांच्या निर्मिती-दिग्दर्शनाची अनेक वैशिष्ट्यं सहजी लक्षात येतात. भारतीय सिनेमात क्लासिक म्हणून ओळखला जाणारा *गाईड* त्यांच्या प्रतिभेचं, दिग्दर्शनाचं आणि व्हीजनचं एक सुरेख उदाहरण म्हणावं लागेल. हा सिनेमा इंडस्ट्रीत बराच काळ चर्चेत होता. फार थोड्या लोकांना ही गोष्ट माहीत असेल, आधी *गाईड*चं दिग्दर्शन चेतन आनंदनी करावं असं ठरलं होतं. पण ते *हकीकत*च्या महत्त्वपूर्ण


जॉनी मेरा नाम


गाईड


तिसरी मंजिलची टीम


पत्नी सुषमासह


जाना ना दिल से दूर

चित्रीकरणात व्यग्र होते. म्हणून मग दिग्दर्शनाची जबाबदारी राज खोसलावर सोपवायचं ठरलं. पण कसं कोण जाणे, ते काम विजय आनंदकडे आलं आणि त्यांनी कथेचं सोनं केलं. चेतन आनंद किंवा राज खोसला यांनी त्याचं दिग्दर्शन केलं असतं तरीही एक चांगलीच कलाकृती पडद्यावर आली असती, यात तीळमात्र शंका नाही. पण विजय आनंदचा खास टच आपल्याला पाहायला मिळाला नसता. १९६३ मध्ये रिलीज झालेल्या *तेरे घर के सामने*मध्ये त्यांनी हलकीफुलकी रोमॅण्टिक कॉमेडी एका वेगळ्याच शैलीत पेश केली होती.

त्यांच्या फिल्मी कारकीर्दीवर एक नजर टाकली असता लक्षात येतं की, १९६६मध्ये रिलीज झालेला *तिसरी मंजील* आणि १९६७मध्ये आलेला *ज्वेलथीफ*पासून त्यांनी हिंदी चित्रपटांत सस्पेन्स थ्रिलरची एक नवी लाट आणली. *जॉनी मेरा नाम*मधून पुन्हा एकदा ते आपल्या टवटवीत हाताळणीने दिग्दर्शनातून एक कुशल चित्रकार बनून समोर आले. निर्माता म्हणून त्यांचा *तेरे मेरे सपने* १९७१ रोजी पडद्यावर आला आणि त्यात त्यांनी निर्मिती-दिग्दर्शनाबरोबरच अभिनयाचीही बाजू सांभाळली.

विजय आनंदनी *हकीकत, तेरे मेरे सपने, कोरा कागज, चोर चोर, डबल क्रॉस, छुपा रुस्तम, घुंघरू की आवाज, मैं तुलसी तेरे आंगन की*सारख्या अनेक चित्रपटांतून आपल्यातल्या संयत अभिनेत्याचीही चुणूक दाखवली होती. १९८०पर्यंत ते चित्रपटांत सक्रीय होते. १९८०मध्ये त्यांनी *राम बलराम* बनवला. अगदी साठच्या दशकापासून इंडस्ट्रीत सक्रीय असलेले विजय आनंद बदलत्या काळानुसार आपल्या शैलीतही नव्या प्रवाहाचा समावेश करत गेले.

काही वर्षांपूर्वी ते छोट्या पडद्यावरच्या *तहकीकात* या मालिकेतही एका हेराच्या भूमिकेत दिसले. त्यांची प्रतिभा लेखन किंवा दिग्दर्शन किंवा अभिनय अशा कुठल्याही एका चौकटीत कधी बंदिस्त राहूच शकली नाही.

२००१मध्ये सेन्सॉर बोर्डाच्या अध्यक्षपदी ते विराजमान झाले. पण आपल्या तात्त्विक लढाईसाठी त्यांनी त्या पदाचा राजीनामा दिला. त्यावेळी त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितलं होतं की, 'मी माझ्या पद्धतीनेच काम करणार. माझ्या तत्त्वांशी मी कधीच तडजोड करणार नाही.'

आयुष्याच्या एका वळणावर ते ओशोंच्या विचारसरणीत रंगलेलेही दिसले. त्यामुळे त्यांची सर्जनशीलता अधिकच धारदार बनली. इंडस्ट्रीत गोल्डी या लाडक्या नावाने ओळखले जाणारे विजय आनंद जेवढे पापा देव आनंदचे लाडके होते तेवढेच ते इंडस्ट्रीतही प्रिय होते. त्यांचा स्पष्टवक्तेपणा हा त्यांच्या स्वभावाचा आणखी एक विशेष होता. मानवतावाद आणि देशभक्ती या विषयांबद्दल त्यांना आपुलकी होती. एकदा ते म्हणाले होते, 'वसुधैव कुटुंबकम् या वचनावर माझी नितांत श्रद्धा आहे. मी जगात एकच धर्म आहे असं मानतो आणि तो आहे मनुष्यधर्म. तुम्ही तुमच्या घरातल्यांवर प्रेम करा, मग समाजावर प्रेम करा, गावावर प्रेम करा, देशावर करा आणि सगळ्या विश्वावर प्रेम करा. लाहोरचा जन्म असल्याने लाहोर हीच माझी जन्मभूमी आहे. पण आमच्या कुटुंबियांच्या मनात हिंदुस्तानविषयीचं प्रेम आकंठ भरून आहे. आमचे वडील मनमोहन आनंद यांनी पंजाबमधील गुरदासपूरच्या स्वातंत्र्यसैनिकांबरोबर काम केलं होतं. त्यांना त्यासाठी फाशीची शिक्षाही सुनावण्यात आली होती. मागाहून ती रद्द करण्यात आली. आमच्या घरातल्या या क्रांतिकारी पार्श्वभूमीमुळेच देव साहेबांना इंग्रजांच्या काळात नेव्हीत प्रवेश नाकारण्यात आला होता. आम्ही स्वातंत्र्यलढ्याच्या अनेक जखमा मनावर मिरवल्या आहेत. माझा भाचा सीमेवर शहीद झाला होता. त्याच्यासारख्या हजारो सैनिकांना श्रद्धांजली म्हणूनच चेतन आनंदजींनी *हकीकत* बनवला. मी माझ्या *हम दोनों*तही देशभक्तीपर कथा घेतली आहे. आजच्या सिनेमांत देशभक्तीचा आभाव आढळतो.'

देश आणि मानवतेप्रती अशी उच्च विचारधारा असलेल्या विजय आनंद यांनी नेहमीच आपल्या चित्रपटांच्या माध्यमातून तत्कालीन समाजातल्या समस्या हाताळण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

गेल्या काही काळापासून ते आपले पितातुल्य मोठे भाऊ चेतन आनंद यांना समर्पित *जाना ना दिल से दूर*च्या निर्मितीत व्यग्र होते. त्यात देव आनंद महत्त्वपूर्ण भूमिका साकारतायत. पण तो पडद्यावर येण्याआधीच त्यांनी या जगाचा निरोप घेतला. त्यांच्या जाण्याने एक युग संपल्यासारखं वाटतंय. तरीही लेखक, दिग्दर्शक, निर्माता, अभिनेता आणि एक संवेदनशील व्यक्ती म्हणून त्यांचं नाव इंडस्ट्रीत नेहमीच शिखरावर राहील. अशा या महान प्रतिभावंताला 'जी'ची हार्दिक श्रद्धांजली. ✯